विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०२०
**शिवाजी .. वि .. बालाजी व इतर**
वादी तर्फे सा.क्र.५
**(नि.क्र.१०८)**

**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-** सुभाष निवृत्तीराव कसबे, **वय:-** ५३ वर्षे,

**व्यवसाय:-**नौकरी, **रा.**परळी-वैजनाथ**, ता.**परळी-वैजनाथ, **जि.**बीड.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.फड यांच्यामार्फत सुरु.</u>**

**१.** मी नांदगाव वि.का.से.सोसायटी, चाकूर, ता.चाकूर येथे गटसचिव म्हणुन कार्यरत आहे. दिनांक ०५/०८/२०२१ रोजीपासुन मी वि.का.स.सोसायटी, मुळकी येथे कार्यरत होतो. आता मला **नि.क्र.३३/१** लगतचा कागद दाखविला. तो मीच तयार केलेला कागद असुन त्यावर माझी सही, संस्थेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०९** देण्यात येतो. शिवाजी लोहारे यांच्या मागणीवरुन मी हे प्रमाणपत्र दिलेले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कांबळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**२. नि.क्र.१०९** हे पत्र वादी यांनी मला लातुर-रोड येथे मी असताना मागितले आणि मी ते त्यांना तेथेच दिले. पत्रावरती चेअरमन यांची सही मी स्वत: घेतो असे वादी मला म्हणाले. हे खरे की, **नि.क्र.१०९** या पत्रावर जावक क्रमांक नाही व त्याची नोंद आमच्या रजिष्टरला नाही. हे खरे की, मला या दाव्याबद्दल कांही माहिती नाही. माझी आणि वादींची कांही भांडणे नाहीत, संबंध चांगले आहेत हे खरे आहे. **नि.क्र.१०९** या पत्रात १००% वसुल केला हा मजकूर चुकलेला आहे. हे खरे की, वादींचे आणि माझे संबंध जवळचे असल्याने त्यांनी मला मागणी केल्यामुळे लातूर-रोड येथे **नि.क्र.१०९** हा कागद मी त्यांना दिला.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ व ३ करीता पुर्ण.**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**३.** वि.का.स.सोसाटीचे मुख्य कार्यालय ज्या-त्या गावामध्ये असते. स्थानिक संचालक मंडळाचा या संस्थेवर अंकुश असतो. हे खरे की, संस्थेच्या संचालक मंडळाच्या निर्णयानंतर कार्यवाही केली जाते. हे खरे की, **नि.क्र.१०९** हा संचालक मंडळाचा ठराव झाल्याशिवय दिलेला कागद आहे. हे खरे की, गाव पातळीवर ब-याच वि.का.स.सोसायटी आहेत आणि त्या १००% वसुलीही करतात. हे खरे की, १००% वसुलीच्या इतर गावांच्या तुलनेत वादींचे कार्य वेगळेपणाचे नाही. दिनांक ०५/०८/२०२१ पासुन पुढे ६-७ महिने मी मुळकी गावात कार्यरत होतो. **नि.क्र.१०९** हे पत्र वादीच्या गौरवासाठी दिलेले नाही हे खरे आहे. वादी यांनी मागणी केल्याने मी त्यांना पत्र दिले. मात्र असे पत्र देण्याचे कारणही नव्हते. हे खरे की, असे पत्र देण्यासाठी संचालक मंडळाने मला अधिकार दिलेले नाहीत. पंचायत समिती कर्मचा-यांनी वादीवर गुन्हा दाखल केला आहे याची **नि.क्र.१०९** हे पत्र देताना मला माहिती नव्हते. वादीने हे पत्र कोणत्या कारणासाठी मागितले हे मला माहिती नाही. हे खरे की, वादीच्या मागणीचा अर्ज किंवा मी नि.क्र.१०९ दिल्याबद्दलची नोंद आमच्या अभिलेखी नाही. वादी हे प्रतिष्ठीत किंवा सन्माननीय व्यक्ती आहेत म्हणुन हे पत्र मी दिलेले नाही हे खरे आहे. हे खरे की, एखादी व्यक्ती स्वत:चा सन्मान करावा अशी मागणी करणारे पत्र देत असेल तर त्याचा सन्मान करणारे पत्र देता येत नाही. हे खरे की, वादीने मागणी केल्यामुळे मी हे पत्र दिले आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ करीता पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:२४/०४/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.